M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

क्र.मुविमं/उमा/माध्य./परीक्षा/४१८२
वाशी, नवीमुबई ४००७०३
दिनांक १५/१०/२०२५

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक,
मुंबई विभागीय मंडळ कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक व उच्च माध्य.शाळा
कनिष्ठ महाविद्यालये,
मुंबई/बृहमुंबई/ठाणे/पालघर/रायगड जिल्हे.

विषय – उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु.–मार्च २०२६ परीक्षांच्या तारखांबाबत..

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रु./मार्च २०२६ परीक्षांच्या लेखी, प्रात्यक्षिक व इतर परीक्षा पुढील तारखांना आयोजित करण्यात येणार आहेत.

अ. क.	तपशील	उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२वी) परीक्षा कालावधी	माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा कालावधी
१	लेखी परीक्षा	मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार दि. १८ मार्च २०२६ (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयाच्या ऑनलाईन परीक्षेसह)	शुक्रवार, दि.२० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार, दि. १८ मार्च २०२६
२	प्रात्यक्षिक, श्रेणी,तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा	शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ ते सोमवार दि. ०९ फेब्रुवारी २०२६ (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयाच्या ऑनलाईन परीक्षेसह)	सोमवार, दि.०२ फेब्रुवारी २०२६ ते बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी–मार्च २०२६ परीक्षेच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या तारखा वरीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहेत.

उपरोक्त परीक्षांचे विषयनिहाय सविस्तर अंतिम वेळापत्रक स्वतंत्रपणे संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करण्यात येईल.

(ज्योत्स्ना शिंदे–पवार)
विभागीय सचिव(प्र.)
मुंबई विभागीय मंडळ, वाशी,
नवी मुंबई ४००७०३.